दैनिक
# महावृत्त
E-Mail:dainikmhavratt@gmail.com
संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

Bharat Chandak
SATYA ELECTRICALS
POLYCAB Racold legrand HAVELLS INDOASIAN
Finolex KOLORS USHA PHILIPS GreatWhite SIEMENS
Tapadia Market, Chain Sukh Road, Latur-413512
Ph :(O) 243678, 244458, 250776, (R) 242018
Email:satyaelectricals@rediffmail.com

लातूर वर्ष ३ रे अंक २२९ वा बुधवार दि.१४ फेब्रुवारी २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

# गरीब वृद्ध कलावंतांच्या वृद्धाश्रमासाठी अंबरनाथमध्ये जमीन उपलब्ध करून देणार-उद्योग मंत्री उदय सामंत

## महासंस्कृती महोत्सवाच्या माध्यमातून मराठी कलावंतांना व्यासपीठ उपलब्ध






लातूर, दि. १३ (जिमाका): मुंबईतील गरीब वयोवृद्ध नाट्य कलावंत आणि बॅकस्टेज आर्टिस्ट यांच्याकरिता वृद्धाश्रम उभारण्यासाठी मुंबईजवळच जमीन देण्याचे आपण जाहीर केले होते. त्यानुसार मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मान्यतेने अंबरनाथ येथे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत दोन एकर जमीन देण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे विश्वस्त तथा उद्योग मंत्री उदय सामंत यांनी आज येथे सांगितले. तसेच मराठी नाट्य कलावंतांना व्यासपीठ मिळवून देण्यासाठी राज्य शासनाने महासंस्कृती महोत्सव आयोजित केला असल्याचे त्यांनी सांगितले. राज्य शासनाचा पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग आणि जिल्हा प्रशासनाच्यावतीने आयोजित महासंस्कृती महोत्सव, तसेच अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या विभागीय १०० वे नाट्यसंमेलनाचे उद्घाटन उद्योग मंत्री श्री. सामंत बोलत होते. अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे अध्यक्ष मोहन जोशी, नाट्य संमेलनाध्यक्ष जब्बार पटेल, पद्मभूषण डॉ. अशोक कुकडे, आमदार संभाजी पाटील निलंगेकर, जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, परिविक्षाधीन जिल्हाधिकारी नमन गोयल, महानगरपालिका आयुक्त बाबासाहेब मनोहरे, दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, सचिव रमेश बियाणी, अखिल भारतीय नाट्य परिषदेचे भाऊसाहेब भोईर, सतीश लटके, शैलेश गोजमगुंडे, प्रदीप पाटील खंडारपूरकर, संजय अयाचित यांची यावेळी उपस्थिती होती.

राज्य शासन मराठी कलावंतांसोबत असून अखिल भारतीय नाट्य परिषदेला विविध उपक्रमांसाठी शासनाने निधी उपलब्ध करून दिला आहे. भविष्यातही चांगले नाट्यकर्मी तयार होण्यासाठी नाट्य परिषदेने विविध उपक्रम राबविण्याची आवश्यकता आहे. महासंस्कृती महोत्सव, नाट्य संमेलनासारखे उपक्रम सातत्याने आयोजित होण्याची गरज आहे. चांगल्या नाटकासाठी चांगली संहिता गरजेची असते. त्यामुळे राज्यात चांगल्या नाट्य संहिता लेखकांचा शोध घेण्यासाठी स्पर्धांचे आयोजन केले जावे. नाट्य चळवळीच्या विकासासाठी बालनाट्य, हौशी आणि प्रायोगिक नाट्य रंगभूमीला बळ देण्याची गरज असल्याचे श्री. सामंत म्हणाले. मराठी कलावंत आणि स्थानिक कलाकारांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी राज्य शासनाने महासंस्कृती महोत्सव सुरु केला आहे. यासोबतच लातूर येथे अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे विभागीय १०० वे नाट्य संमेलन होत असून जिल्हा प्रशासन आणि नाट्य परिषदेने या दोन्ही कार्यक्रमांचे चांगले नियोजन केल्याबद्दल श्री. सामंत यांनी समाधान व्यक्त केले.

सध्या ग्रामीण भागात अनेक चांगली नाटके लिहून सादर केली जात आहेत, ही अतिशय कौतुकास्पद बाब आहे. ग्रामीण कलाकारांनी भाषेची भीड न बाळगता आपल्या नाटकांची संहिता लेखन आणि सादरीकरण दमदार करण्यावर भर देण्याची गरज आहे. यामधूनच उद्याची व्यावसायिक नाटके आणि नाट्य कलावंत घडतील, असा विश्वास नाट्य संमेलनाध्यक्ष जब्बार पटेल यांनी व्यक्त केला. तसेच प्रायोगिक रंगभूमी ही व्यावसायिक रंगभूमीची प्रयोगशाळा आहे. येथेच कलाकार खऱ्या अर्थाने घडतात. त्यामुळे प्रायोगिक रंगभूमीला बळ देवून प्रायोगिक नाटकांची चळवळ रुजविण्यासाठी प्रयत्न करण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

महासंस्कृती महोत्सव, तसेच विभागीय १०० वे नाट्यसंमेलनामुळे लातूरचे सांस्कृतिक वैभव उजळणार आहे. तसेच लातूरमधील नाट्य चळवळ रुजण्यासाठी या कार्यक्रमांची मदत होईल, असा विश्वास पद्मभूषण डॉ. अशोक कुकडे यांनी सांगितले. लातूर येथे होत असलेल्या महासंस्कृती महोत्सव व विभागीय १०० वे नाट्यसंमेलनाचे अतिशय चांगले आयोजन करण्यात आले आहे. सर्वात महत्वाचे म्हणजे अचूक कार्यक्रमांची निवड करून रसिकांना सांस्कृतिक मेजवानी देण्याचा प्रयाण कौतुकास्पद असल्याचे अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे अध्यक्ष मोहन जोशी यांनी सांगितले.

लातूर जिल्हावासियांना महासंस्कृती महोत्सव, तसेच विभागीय १०० वे नाट्यसंमेलनामुळे अतिशय चांगली सांस्कृतिक मेजवानी मिळाली असून या कार्यक्रमांच्या आयोजनाची संधी लातूरला दिल्याबद्दल आमदार संभाजी पाटील निलंगेकर यांनी आभार व्यक्त केले. तसेच जिल्ह्यातील नागरिकांनी १५ फेब्रुवारीपर्यंत आयोजित विविध कार्यक्रमांना उपस्थित राहण्याचे आवाहन केले. महासंस्कृती महोत्सव, तसेच विभागीय १०० वे नाट्यसंमेलनाच्यामाध्यमातून जिल्हा प्रशासन आणि अखिल भारतीय नाट्य परिषदेच्या लातूर शाखेने नागरिकांसाठीदर्जेदारसांस्कृतिककार्यक्रमांचेनियोजन केले आहे. यामाध्यमातून स्थानिक कलावंतांना संधी देवून त्यांना व्यासपीठ उपलब्ध करून दिल्याचे जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी सांगितले. अखिल भारतीय नाट्य परिषदेचे भाऊसाहेब भोईर, सतीश लटके यांनी मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक शैलेश गोजमगुंडे यांनी केले. यामध्ये त्यांनी महासंस्कृती महोत्सव आणि विभागीय १०० वे नाट्यसंमेलन आयोजनाचा हेतू विशद केला. नटराज पूजन आणि दीपप्रज्वलनाने महासंस्कृती महोत्सव आणि विभागीय १०० वे नाट्यसंमेलनाचे उद्घाटन करण्यात आले. तसेच नाट्यसंमेलन स्मरणिकेचेही यावेळी प्रकाशन करण्यात आले. या कार्यक्रमांच्या आयोजनासाठी मेहनत घेत असलेले शासकीय अधिकारी, नाट्य परिषदेचे पदाधिकारी यांचा यावेळी सन्मान करण्यात आला. सूत्रसंचालन उद्धव फड आणि सतीश लोटके यांनी केले.

'येळवस' च्या दालनाला ना. उदय सामंत यांची भेट महासंस्कृती महोत्सवात लातूरच्या आगळ्यावेगळ्या संस्कृतीचे दर्शन घडविण्यासाठी जिल्ह्यात साजऱ्या होणाऱ्या वेळ अमावस्या अर्थात 'येळवस'चे स्वतंत्र दालन दयानंद महाविद्यालय मैदानाच्या खाद्य दालनात उभारण्यात आले आहे. उद्योग मंत्री उदय सामंत यांच्यासह महासंस्कृती महोत्सवाच्या उद्घाटनाला उपस्थित मान्यवरांनी आज या दालनाला भेट दिले. तसेच येळवसला बनविण्यात येणाऱ्या भज्जी, आंबिल आणि उंडे या पदार्थांचा आस्वाद घेतला.

# देशाचे संविधान धोक्यात आहे, राष्ट्रवादीचे नेते शरद पवार यांनी केली चिंता व्यक्त

उल्हासनगर / प्रतिनिधी : भारत देश उभा करणाऱ्या माजी पंतप्रधान जवाहरलाल नेहरूवर सतत टीका करणारे पंत प्रधान नरेंद्र मोदी हे सत्तेचा गैरवापर करून संविधान धोक्यात आणण्याचा प्रयत्न करत असुन आम नागरिकांच्या मूलभूत अधिकारावर गदा आणुन देशोधडीला लावत असल्याची टीका राष्ट्रवादीचे राष्ट्रीय नेते शरद पवार यांनी संविधान हक्क परिषदेने आयोजित केलेल्या एल्गार परिषदमध्ये केली आहे . या वेळी राष्ट्रवादी कॉंग्रेस चे नेते जितेंद्र आव्हाड, महेश तपासे , पत्रकार किरण सोनावणे यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. उल्हासनगर कॅम्प नं-५ येथील दसरा मैदानात संविधान हक्क परिषदेने एल्गार परिषदेचे आयोजन केले होते. यावेळी



राष्ट्रवादीचे नेते जितेंद्र आव्हाड यांनी देशात व राज्यात भयावह परिस्थिती या सत्ताधाऱ्यानी निर्माण केली असून राज्याने उत्तरप्रदेश व बिहारला मागे टाकले आहे. देशात कुठे पोलीस ठाण्यात आमदाराने गोळीबार केला नसेल, असे प्रकार शहरात घडत आहेत. तसेच सर्वसामान्य नागरिकांच्या मुला मुलीनी शिक्षण घेऊ नये यासाठी शिक्षणाचे विकेंद्रीकरण करीत असल्याचा आरोप केला आहे . ज्या नागरिकांना मतदानाचा हक्क दिला, त्यांनी त्याचा वापर केला नाहीतर, देश हुकूमशाहीकडे जात असल्याची खंत व्यक्त केली. दरम्यान यापुढे साहेबांच्या विरोधात बोलणाऱ्याना सोडणार नसल्याचा इशाराही आव्हाड यांनी दिला आहे.

राष्ट्रवादी पक्षाचे राष्ट्रीय नेते शरद पवार यांनी संविधान हक्क परिषदेने आयोजित केलेल्या सभेला आवर्जून आल्याचे सांगितले. सभेला गर्दी महत्वाची नसून या सभेचा उद्देश जनमानसात जाणे आवश्यक असल्याचे पवार म्हणाले. देश स्वातंत्र्य झाला त्यावेळी देश उभा करण्यासाठी माजी पंतप्रधान जवाहरलाल नेहरू त्यांच्या मंत्रीमंडळातील डॉ बाबासाहेब आंबेडकरासह अन्य जणांनी जीवाचे रान केले. मात्र ज्यांनी देश उभा केला. त्यांच्यावरच टीकाटिप्पणी होत आहे. शेजारील देशात जी परिस्थिती निर्माण झाली. ती परिस्थिती देशात निर्माण होण्याची भीतीही पवार यांनी व्यक्त केली. पुण्यातील निर्भय बनो या कार्यक्रमा वेळी निखिल वागळेसह अन्य जणांवर हल्ला झाला असून असे प्रकार राज्यात होत आहेत. संविधान व अधिकारावर गदा येत असल्याने, सर्वांनी एकत्र येणे गरजेचे असल्याचे मतही त्यांनी व्यक्त केले. या सभेमध्ये महेश तपासे, ज्येष्ट पत्रकार किरण सोनावणे यांनी चांगले मार्गदर्शन केले . तर शिवसेना ठाकरे गटाचे जिल्हा समन्वयक धनंजय बोडारे, राजेश वानखडे, कॉंग्रेसचे जिल्हाध्यक्ष रोहित साळवे, अण्णासाहेब रोकडे, सदामामा पाटील यांच्यासह माजी आमदार उपेंद्र शेंडे , गायिका उषा भगत , निशा भगत हे उपस्थित होते. तर कार्यक्रमाचे सुत्रसंचालन संविधान हक्क परिषदेचे महासचिव अनिल अहिरे यांनी केले असुन आभार प्रदर्शन परिषदेचे अध्यक्ष रामचंद्र जाधव यांनी केले आहे.

# राज्यातील प्रत्येक जिल्ह्यातील जिल्हा सामान्य रुग्णालय होणार सुपर स्पेशालिटी रुग्णालय -मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

उल्हासनगर / प्रतिनिधी : राज्यातील जनतेला उत्तम प्रकारच्या आरोग्य सोयी सुविधा देण्यासाठी हे शासन कटिबद्ध असून प्रत्येक जिल्ह्यातील जिल्हा सामान्य रुग्णालय हे सुपर स्पेशालिटी रुग्णालय बनविणार असे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उल्हासनगर येथील रुग्णालय उद्घाटन प्रसंगी केले आहे .

उल्हासनगर महापालिकेच्या सुपर स्पेशालिटी रुग्णालयाचा लोकार्पण सोहळा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते पार पडला, त्यावेळी ते बोलत होते.

या प्रसंगी केंद्रीय पंचायतराज राज्यमंत्री कपिल पाटील, खासदार डॉ . श्रीकांत शिंदे, सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण, आमदार कुमार आयलानी,आमदार डॉ.बालाजी किणीकर,प्रशासक तथा आयुक्त अजीज शेख आदि मान्यवर उपस्थित होते. मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले की, सुपर स्पेशालिटी रुग्णालय ही काळाची गरज आहे. ही गरज ओळखून हे शासन नागरिकांना उत्तम दर्जाची आरोग्य सेवा देण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करीत आहे. ठाणे जिल्ह्यातून कॅशलेस सेवा देणारे पहिले रुग्णालय सुरू करण्यात आले असुन आता हे उल्हासनगर महापालिकेचे कॅशलेस सेवा देणारे दुसरे सुपर स्पेशालिटी रुग्णालय झाले आहे . तर अशाच प्रकारे काही दिवसातच मीरा-भाईंदर येथेही कॅशलेस सेवा देणारे सुपर स्पेशालिटी रुग्णालयाचे उद्घाटन होणार आहे .

ते पुढे म्हणाले की रुग्णालयात दाखल करण्याची वेळ आल्यानंतर कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीला पैशांची चिंता भेडसावते.मात्र आता शासनाने महात्मा फुले जन आरोग्य योजनेची व्याप्ती ही दीड लाखाहून पाच लाखावर आणली आहे. त्यामुळे आता कोणालाही आपल्या रुग्णाच्या उपचारांसाठी होणाऱ्या खर्चाची



चिंता करण्याची आवश्यकता नाही. शासनाकडून पाच लाखापर्यंतचे उपचार विनामूल्य करून देण्यात येणार आहेत.

राज्यातील आरोग्य व्यवस्था बळकट करण्यावर भर देताना ठाणे, मुंब्रा येथे कॅन्सर हॉस्पिटल चे काम सुरू आहे. त्याचबरोबर एशियन डेव्हलपमेंट बँकेच्या माध्यमातून चार हजार रुपये कोटी रुपयांची मदत राज्य शासनाला मिळणार असून त्यातून आरोग्य व्यवस्थेचे बळकटीकरण करण्यात येणार आहे,असे सांगून मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले. हे राज्य प्रगतीपथावर असुन विशेषतः कृषी, आरोग्य, शिक्षण, पर्यावरण आणि पायाभूत सुविधा या विषयांवर राज्य शासनाकडून नियोजनबद्ध काम करण्यात येत आहे. लेक लाडकी योजना, एसटीमध्ये ५०% मोफत सवलत, चार कोटी महिलांची आरोग्य तपासणी अशा विविध माध्यमातून शासन महिलांसाठी आणि महिलांच्या आरोग्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करीत आहे. लवकरच राज्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रातील केंद्राच्या बळकटीकरणाबाबतचे कामही सुरू होणार आहे. ठाण्यातील ९०० खाटांचे जिल्हा सामान्य रुग्णालय डिसेंबर अखेर पूर्ण करण्याचा प्रयत्न आहे.

राज्य शासन आरोग्य व्यवस्था अधिकाधिक उत्तम दर्जाची करण्यासाठी प्रयत्नशील आहे. तरी शासकीय वैद्यकीय अधिकाऱ्यांनी, डॉक्टरांनी आणि आरोग्य क्षेत्रातील कर्मचाऱ्यांनी नागरिकांना उत्तम आरोग्य सेवा देण्याचा प्रामाणिकपणे प्रयत्न करावा, असे आवाहनही त्यांनी शेवटी केले. या कार्यक्रमाच्या निमित्ताने केंद्रीय पंचायत राज राज्यमंत्री कपिल पाटील, राज्याचे सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) रवींद्र चव्हाण,खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. उल्हासनगर महापालिकेचे प्रशासक तथा आयुक्त अजिज शेख यांनी प्रास्ताविक केले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुप्रसिद्ध निवेदिका तेजल बोडके-नागरे यांनी केले.

## संपादकीय....

### अशोकरावांचा 'आदर्श'!

कोकणात ज्याप्रमाणे राणे पिता-पुत्रास भाजपने आपल्यात घेतले त्याप्रमाणे मराठवाड्यात अशोकरावांचे झाले, त्यांच्या साथीने आणखी आमदार गेले तरी नवल नाही आजमितीस अभिनंदन अशोक चव्हाण यांचे करावे की भाजपचे हा सर्वात मोठा गहनगंभीर प्रश्न ठरतो. अशा परिस्थितीत ते दोघांचेही करणे इष्ट. हे दोनही घटक अभिनंदनास तितकेच पात्र ठरतात. अशोक चव्हाण यांनी एकदा काय तो निर्णय घेतला, हे बरे झाले. त्यासाठी ते अभिनंदनीय. महाराष्ट्रात कोणीही फुटणार अशी वदंता आली की पहिल्यांदा गेली काही वर्षे अशोकरावांचे नाव घेतले जायचे. म्हणजे फुटणारी व्यक्ती अशोक चव्हाण असेल याची खात्री राजकारणाच्या व्हॉट्सपी निरीक्षकांसही होती. हा जसा या निरीक्षकांच्या चाणाक्षतेचा मोठेपणा तशीच ती अशोक चव्हाण यांच्या विश्वासार्हतेचीही 'पावती'च म्हणायची. इतक्या प्रत्येकास एखादा नेता जेव्हा संभाव्य फुटीर वाटत असतो तेव्हा त्या नेत्यांची पुण्याई किती हेही दिसून येते. हा एक भाग. दुसरीकडे भाजपचे अभिनंदन करण्याचे कारण सोमवारच्या ताज्या घटनेपुरतेच मर्यादित असणार नाही. जेव्हा अशोकराव भाजपत जातील त्या वेळी ही घटनामालिका पूर्ण होईल. तूर्त भाजपचे अभिनंदन अशासाठी की अशोक चव्हाण हे आपले संभाव्य लक्ष्य आहे याची हवा त्या पक्षाने इतक्या प्रदीर्घपणे निर्माण केली की काही दिवसांनी सोनिया वा राहुल गांधी यांनीच अशोकरावांस तुमच्या भाजप प्रवेशाचे काय, असे विचारले असते. ही वेळ अशोकरावांनी आणली नाही आणि ती येण्याच्या आधीच पक्षसदस्यत्वाचा राजीनामा दिला. इतकी वर्षे एका पक्षात काढल्यावर जरा थारेपालट हवा, अशा अर्थाचे विधान अशोकरावांनी केले. सध्या सर्वपक्षीयांस थारेपालटासाठी एकमेव आधार आहे.तो म्हणजे अर्थातच भाजप. तेव्हा आज ना उद्या अशोकराव भाजपत जातील हे निश्चित. तिकडे बिहारात नितीशकुमार यांची दुसरी वा तिसरी (की चवथी) घरवापसी विधानसभेत यशस्वी ठरत असताना महाराष्ट्रातही अशोकरावांनी भाजपत जाण्याचा निर्णय घेतला असेल तर त्यात काही आश्चर्य नाही. अशोकरावांच्या साथीने आणखीही काही आमदार काँग्रेसमध्ये गेले तरीही आश्चर्य नाही. आजकाल मूळ भाजपवासीयांपेक्षा अन्य पक्षांतील ज्येष्ठांना भाजपत बरे दिवस आलेले आहेत. अशोकराव तर माजी मुख्यमंत्री. परत माजी मुख्यमंत्री व केंद्रीय गृहमंत्री शंकरराव चव्हाण यांचेही ते सुपुत्र. म्हणजे डबल पॉवरफुल. तेव्हा अशी व्यक्ती आपल्या गळाला लागली तर भाजप कशाला सोडेल? यात प्रश्न इतकाच होता की अशोकरावांचा घास घ्यायला इतका वेळ का लागला? गेली काही वर्षे संभाव्य फुटिरांत अग्रमानांकित असलेले अशोकराव अजूनही भाजपवासी झालेले नाहीत. सोमवारी त्यांनी त्या दिशेने पहिले पाऊल टाकले. म्हणजे काँग्रेसचा राजीनामा दिला. तो देताना आपल्या आमदारकीचाही त्यांनी त्याग केला. आपली यानंतरची भूमिका लवकरच सांगू असे ते म्हणतात. याचा अर्थ इतक्या वर्षांच्या संभाव्य फुटीरतेच्या चर्चेनंतरही अशोकरावांस निर्णय घेण्यास अजून दोन-चार दिवस हवे आहेत. कदाचित पुढील दोन दिवसांत भाजपचे माजी अध्यक्ष आणि आजी गृहमंत्री अमित शहा यांच्या होऊ घातलेल्या महाराष्ट्र दौऱ्यात ते अधिकृतपणे भाजपत प्रवेश करतील. भाजपतर्फे राज्यसभेची उमेदवारीही त्यांना कदाचित मिळेल. त्या पक्षात सद्य:स्थितीत अन्य पक्षीयांचेच स्वपक्षीयांपेक्षा भले होते. त्यामुळे उद्या भाजपत जाणाऱ्या अशोकरावांना परवा भाजपचे तिकीट मिळेलही.पण त्यानिमित्त भाजपसही एका आज्ञाधारक नेत्याचा लाभ होईल. काँग्रेसमधील आपल्या वास्तव्यात अशोकराव हे पक्षश्रेष्ठींचा माणूस असेच ओळखले जात. ही सवय त्यांना भाजपत अत्यंत उपयोगी पडेल. ही नेतृत्वनिष्ठा ही अशोकरावांच्या रक्तातच असावी. आणीबाणीच्या काळात अशोकरावांचे पिताश्री शंकरराव चव्हाण यांनी काँग्रेसचे तत्कालीन पक्षश्रेष्ठी संजय गांधी यांची पादत्राणे वाहिली होती. त्या वेळी त्यांच्यावर सडकून टीका झाली होती. पण शंकरराव बधले नाहीत की त्यांनी महाराष्ट्राची माफीही मागितली नाही. पक्षप्रमुखांच्या चरणी निष्ठा वाहणे याचा हा मूर्तिमंत धडा. तो घरातल्या घरातच मिळालेला असल्याने अशोकरावांना तो भाजपतील भावी वास्तव्यात प्रगतिपथावर जोमाने घेऊन जाईल, हे निश्चित. आणि दुसरे असे की यानिमित्ताने तरी त्यांच्या मानेवरील आदर्श घोटाळ्याचे भूत कायमचे उतरवले जाईल. मुंबईतील आदर्श नामक इमारतीच्या घोटाळ्यात सहभाग असल्याचे सिद्ध झाल्याने अशोकरावांना मुख्यमंत्रीपदावरून पायउतार व्हावे लागले होते. तेव्हापासून ते भूत त्यांच्या मानेवर बसले ते बसलेच. जेव्हा केव्हा अशोकरावांनी जरा काही हालचाल केली, भाजपवर आरोप वगैरे करण्याचा प्रयत्न केला की लगेच आदर्श घोटाळ्याची 'फाइल' पुन्हा खुली करण्याची चर्चा सुरू होई. परिणामी कासव कसे संकटाची चाहूल लागली की आपले शरीर आकसून घेते तसे अशोकराव स्वत:स आकसून घेत. ही त्यांची कुचंबणा आता कायमची दूर होईल. बरोबर दहा वर्षांपूर्वी नांदेड येथील सभेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सहा महिन्यांत अशोक चव्हाण यांस आदर्श घोटाळ्यासाठी तुरुंगात पाठवू असे आश्वासन मतदारांस दिले होते. काही दिवसांतच अशोकराव भाजपत जातील. सर्व घोटाळे करून, पचवून ताठ मानेने जगू इच्छिणाऱ्यांसाठी सद्य:स्थितीत भाजपखेरीज अन्य पर्याय नाही. तोच अशोकरावांनी निवडला. त्याबद्दल त्यांना दोष देण्यात काय हशील. हे झाले अशोकरावांचे काय भले झाले याबद्दल.आता भाजपविषयी. अशोकरावांच्या येण्याने भाजपस मराठवाड्यात एक मराठा चेहरा मिळेल. त्या परिसरात भाजपस तितकेसे स्थान नाही. याचे कारण त्यांची २०१९ पर्यंत शिवसेनेबरोबर असलेली युती. शिवसेनेस त्यामुळे मराठवाड्यात चांगले बस्तान बसवता आले. काँग्रेसचे स्थान होतेच. काँग्रेसेतर मतदार मोठ्या प्रमाणावर शिवसेनेकडे गेले. त्या शिवसेनेकडील मतदारांचा 'करेक्ट कार्यक्रम' एकनाथ शिंदे यांच्या शिवसेना त्यागाच्या माध्यमातून भाजपने करवला. शिंदे यांच्यासमवेत त्यामुळेच मराठवाड्यातील अनेक नेते भाजपशी हातमिळवणी करते झाले. या दोन पक्षांच्या तुलनेत भाजपस त्या परिसरात विस्ताराची तितकी संधी मिळाली नाही. जेथे स्वत:चे नेतृत्व नाही, तेथे अन्य पक्षातील प्रस्थापित नेतृत्व आयात करण्यास भाजप बिलकूल कचरत नाही. उदाहरणार्थ कोकण. तेथे ज्याप्रमाणे राणे पिता-पुत्रास भाजपने आपल्यात घेतले त्याप्रमाणे मराठवाड्यात अशोकरावांचे झाल्यास नवल नाही. आणि अशोकरावांस तसेही भाजपत जुळवून घेणे तितके अवघड जाऊ नये.

# कोचिंग क्लासेस हवेत कशाला?

गिरीश सामंत शालेय शिक्षणाची औपचारिक व्यवस्था अस्तित्वात असताना भरमसाट फी भरून आणि मुलांची ओढाताण वाढवून कोचिंग क्लासला पाठविण्याची गरज भासते, याचा अर्थ शालेय शिक्षण व्यवस्थेत काही गंभीर त्रुटी आहेत. त्या दूर करण्यासाठी सरकार, शिक्षक आणि पालकांना विशेष प्रयत्न करावे लागतील केंद्र सरकारने कोचिंग क्लासवर बंदी आणल्याच्या बातम्या काही दिवसांपूर्वी प्रसिद्ध झाल्या. खरे म्हणजे, तो दस्तावेज हा केंद्र सरकारने जारी केलेले धोरण/ मार्गदर्शक तत्त्वे/ मॉडेल नियमावली या स्वरूपाचा आहे. संबंधित राज्याने याविषयीची कायद्याची चौकट उभी केल्यावरच ते नियम लागू होतील.कायदा सुव्यवस्थेचा बोजवारा, वकीलांच्या गटानं पोलीस अधिकाऱ्याला केली बेदम मारहाण हे धोरण येण्याआधीच बिहार, उत्तरप्रदेश, गोवा, कर्नाटक, मणिपूर आणि राजस्थानसारख्या राज्यांनी कोचिंग क्लासेस संबंधी कायदे आणि नियम केले आहेत. परंतु महाराष्ट्र राज्याने या संबंधी काहीही केलेले नाही, हे अत्यंत खेदाचे आणि नामुष्कीचे आहे. कोचिंग क्लासेसचे नियमन करण्यासाठी कायदा आणणे, ही एक बाब झाली. परंतु महत्त्वाचे असे की, औपचारिक शिक्षणासाठी शाळा ही व्यवस्था अस्तित्वात असताना कोचिंग क्लासची गरजच का पडते? ते समजून घेऊया मूळ समस्या खऱ्या अर्थाने मुलांना शिकते करण्याऐवजी आणि दर्जेदार शिक्षण देण्याऐवजी गेल्या चार दशकांत आपण त्यांना केवळ परीक्षार्थी बनवले आणि सतत जीवघेण्या स्पर्धेत ढकलत आलो आहोत. ही खरी समस्या आहे. मुले विचार करू शकतात का, त्यांची समज वाढत आहे का, मिळालेल्या ज्ञानाचे ती उपयोजन करू शकतात का, शिकत असताना आजूबाजूच्या जगाशी त्यांची नाळ जोडली जात आहे का, स्वयंअध्ययनाचे कौशल्य त्यांनी मिळविले आहे का, अशा, मुलांच्या विकासासाठी अत्यावश्यक असणाऱ्या अनेक बाबींकडे आपण पूर्णपणे दुर्लक्ष केले. गुणवत्ता यादीत झळकण्यासाठी आणि ठरावीक महाविद्यालयात प्रवेश मिळवण्यासाठी केवळ अधिकाधिक गुण मिळवणे, इतकेच मर्यादित उद्दिष्ट आपण त्यांच्यासाठी ठरवून दिले आणि केवळ त्यासाठीच आग्रह धरला. त्यामुळे कोचिंग क्लास संस्कृती फोफावत गेली. ती इतकी, की शाळा दुय्यम ठरावी. शाळा आणि शिक्षक मुले शिकती होण्याची प्रमुख जबाबदारी खरे तर शाळा आणि शिक्षकांची असते. त्यासाठी बी.एड., डी.एड. या अर्हतेखेरीज शिक्षकांकडे पोषक मानसिकता आणि दृष्टिकोन असायलाच हवा. मूल शिकते कसे, प्रत्येक मुलाच्या गरजा कोणत्या, त्याच्या शिकण्यातले अडथळे कोणते आणि त्यावर उपाययोजना कशा करायच्या, याची पक्की जाण शिक्षकांना असायला हवी. शिक्षक म्हणतात, आम्ही जीव तोडून शिकवतो. ते मान्य आहे. पण मग मुले शिकती का होत नाहीत? महाराष्ट्रात मुले शिकत नाहीयेत, हे वास्तव स्वीकारायला हवे. ते मान्य असले, तर सुधारणेचे मार्ग शोधता येतील. आपले काम परिपूर्ण आहे, असे शिक्षकांनी मानणे मला धोकादायक वाटते. स्वतःच्या कामाबद्दल आपण थोडेसे असमाधानी राहिलो, तर बदल घडू शकतात. अन्यथा नाही.बहुसंख्य शिक्षकांना आपले काम चांगले व्हावे, मुले खऱ्या अर्थाने शिकती व्हावीत, असे वाटत असते. पण नेमके काय करायचे ते उमजत नाही. इथे कस लागतो तो आपल्या प्रशिक्षण व्यवस्थेचा. 'शिक्षकांचा सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास' हा विचार फक्त कागदावर राहतो. विद्यार्थ्यांना शाळेत, महाविद्यालयात आणि बी.एड., डी.एड.च्या सेवापूर्व प्रशिक्षणातून तसेच शिक्षक झाल्यावर सेवांतर्गत प्रशिक्षणातून फारसे काही हाताला लागत नाही. मग शिक्षक त्यांच्या विद्यार्थ्यांना तरी कसे शिकवणार? ज्या पद्धतीने ते स्वतः शिकले, त्याच पद्धतीने ते शिकवणार. त्यामुळे आपल्या प्रशिक्षण व्यवस्थेचा नव्याने विचार करण्याची आणि त्यात तातडीने आमुलाग्र बदल करण्याची गरज आहे. सरकारच्या प्रशिक्षण व्यवस्थेत सुधारणा होईपर्यंत न थांबता किंवा सर्वस्वी त्या व्यवस्थेवर अवलंबून न राहता, शाळा आणि खासगी संस्थाचालक प्रयत्न करू शकतात, हे मी अनुभवावरून सांगू शकतो. नव्हे, ती शाळा आणि संस्थांची जबाबदारी आहे, असे मी मानतो. शिक्षक संघटनांनीसुद्धा ही जबाबदारी स्वीकारायला हवी. शिक्षकांची पोषक अशी मानसिकता आणि दृष्टिकोन तयार होण्यासाठी संघटनेने प्रयत्न करायला हवेत. अखेरीस, या सर्व बाबी विद्यार्थ्यांच्या हिताशी निगडित आहेत. शिक्षक संघटनांना माझं आवाहन आहे की, त्यांनी या विषयाला हात घालून ही जबाबदारी स्वीकारावी.सरकारला जबाबदारी टाळता येणार नाही सरकारचे निर्णय दर्जेदार शिक्षणाच्या आड येणारे असतात, असे दिसते. शिक्षणहक्क कायद्यानुसार ३० मुलांमागे किमान एक शिक्षक अनिवार्य असतानाही कमाल एक शिक्षक देणे, कला, क्रीडा शिक्षकांची पदे रद्द करणे, तीन भाषांसाठी एक शिक्षक देणे, बदली शिक्षक न देणे, सेवकांची पदे रद्द करणे, वेतनेतर अनुदान न देणे, शिक्षकांवर शाळाबाह्य कामांचा बोजा टाकणे अशी त्याची काही उदाहरणे देता येतील. असे निर्णय वारंवार घेतले गेले, तर शिक्षणाचा दर्जा घसरतच जाणार.सरकारची कामे डहॉक पद्धतीने होत असतात. त्यामागे विचारपूर्वक केलेले नियोजन नसते. व्यक्तिपरत्वे निर्णय होतात आणि बदलतात. सातत्याने धोरणबदल होतात. मुख्य म्हणजे, विद्यार्थ्यांचे हित लक्षात न घेता, खर्च कमी करणे, हा हेतू प्रबळ ठरतो. त्यामुळे तज्ज्ञ आणि अनुभवी मंडळींचा सल्ला सरकारला रुचत नाही. शालेय शिक्षणातील दर्जेदारपणाच्या अभावाची आणि परिणामी निरंतर सुरू राहणाऱ्या कोचिंग क्लास संस्कृतीची जबाबदारी सरकारला टाळता येणार नाही.पालकही तेवढेच जबाबदार कोचिंग क्लास संस्कृतीसाठी पालकसुद्धा जबाबदार आहेत, असे मला वाटते. मुलाला शाळेत टाकले, की आपली जबाबदारी संपली, असे बहुसंख्य पालकांना वाटत असते. आपल्या पाल्याच्या विकासात शाळेबरोबर आपलीही काही जबाबदारी असते, याची त्यांना जाणीव नसते. मुलाचा विकास कसा होतो, हे त्यांना माहीत नसते. परीक्षेतले गुण हीच हुशारीची मोजपट्टी, असे त्यांना वाटते. त्यामुळे शाळेतले शिकणे पुरेसे नाही, असे वाटून ते मुलांना क्लासमध्ये घालतात. स्वतःला वेळ नसल्यामुळे मुलांना दिवसभरासाठी अडकवून ठेवणे, असाही एक विचार त्यामागे असतो.दर्जेदार शिक्षण म्हणजे काय, मुलांच्या विकासासाठी कशाची गरज आहे, पाल्याची आवड व नावड,



त्याच्या क्षमता पालकांनी समजून घ्यायला हव्यात. आपल्या अपेक्षांचे ओझे त्यांच्यावर लादणे, इतर मुलांबरोबर पाल्याची तुलना करणे, अघोरी जीवघेण्या स्पर्धेत लोटणे अशा गोष्टी करू नयेत, असे मला तीव्रतेने वाटते. खरे तर पालकांनी शाळेवर आणि शिक्षकांवर विश्वास ठेवावा, त्यांच्याकडून दर्जेदार शिक्षणाची अपेक्षा करावी आणि त्यासाठी आग्रह धरावा. तसे केल्याने कोचिंग क्लासची अपरिहार्यता कमी होऊ लागेल.
शिक्षक संघटनांची भूमिका शिक्षकांच्या संघटना प्रामुख्याने वेतनासारख्या वैयक्तिक मागण्यांच्या संदर्भात काम करतात. त्याचबरोबर शिक्षकांचा सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास, सरकारकडून दर्जेदार प्रशिक्षणाची सोय अशा मागण्याही संघटनांनी लावून धरायला हव्यात. दर्जेदार शिक्षक-प्रशिक्षणाची सोय स्वतः करावी. चांगली प्रशिक्षणे मिळाली तर शिक्षकांना हवी असतात. शिक्षकांची पोषक मानसिकता आणि दृष्टिकोन तयार होण्यासाठीही संघटनांनी काम करणे आवश्यक ठरते.

# पुण्याच्या ललित कला केंद्रात अपरिपक्व आणि औचित्यहीन अनुकरणच शिकवले जाते?

प्रसन्न अंबादास देशपांडे वैचारिक आणि कलेच्या माध्यमातील अभिव्यक्ती स्वातंत्र्य ज्या भारतीय संस्कृतीने आपल्याला स्वाभाविकपणे दिलेले आहे, त्याच भारतीय संस्कृतीने सौंदर्यशास्त्र आणि कलेमधील निर्मिती यासंदर्भात एक अप्रतिम तत्त्वसुद्धा दिलेले आहे. ते तत्त्व म्हणजे 'औचित्य'. प्रबोधनकार ठाकरे जेव्हा 'संगीत सीताशुद्धी' या नाटकात सीता आणि त्रिजटा यांच्यातील संवादाचा वापर, भारत देशाला स्वतंत्र करण्यासाठी जनमानसाला पराधीन असणाऱ्या सीतामाई यांची उपमा देतात आणि स्वातंत्र्याच्या आग्रहाचा अन्वयार्थ सर्वांच्या मनापर्यंत पोहोचवतात, तेव्हा एका अप्रतिम कलाविष्काराचे औचित्यपूर्ण सौंदर्य ते साधतात. म्हणूनच, त्या १९०९ मधील कलाकृतीचा २०२३ मध्ये आपण संदर्भ देऊ शकण्या इतपत ती कलाकृती महत्त्वाची ठरते. अडीच हजाराहून अधिक वर्ष शाश्वत अशी भारतीय संस्कृती 'वर्तमानाचे बंधन' यापेक्षा 'गतकाळातील कथानकांच्या चौकटीत नव्या आशयाचे रंग भरण्याची प्रयोगशीलता' तेवढीच शाश्वत ठेवते कारण त्याच संस्कृतीतील कला आणि सौदर्यशास्त्र परंपरा, 'औचित्य' या तत्त्वाचा अवलंब करत आलेली असते. अशा कलेतील 'प्रयोगशीलते'ला कोणत्याही विचारधारेच्या अपयशातून येणारे 'वर्तमानाचे बंधन' खरेच लागू नसते. पण कोणालातरी कोणत्यातरी कारणांनी खूप आनंद झाला आणि तो बघवत नाही म्हणून 'रडीचा डाव' म्हणून उधळलेली बेरंगी प्रयोगशीलता भरतमुनींच्या 'नाट्यशास्त्रातील' 'औचित्य' संकल्पनेचा भंग जेव्हा करते, तेंव्हा रसिक श्रोते 'रसानुभव' करण्यापेक्षा 'रसभंगाचा' अनुभव करतात. रसभंग झालेले श्रोते मग रंगमंचाची चवथी भिंत विसरतात आणि मग 'अवघा रंग एक होतो'. 'सभा-औचित्य' सांभाळण्याचे दायित्व केवळ श्रोत्यांचे नसून, सादरकर्ते आणि श्रोते यांनी एकत्रितपणे ते पार पडायचे असते.
सांधा बदलताना : जुडे वाद-संवाद तो हितकारी राहिला प्रश्न नेमके काय घडले याचा. २ फेब्रुवारीला सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील ललित कला केंद्रात 'रामलीला' कलाकारांच्या 'बॅकस्टेज लाइफ'वर आधारित नाटकाचे 'शैक्षणिक बॅक-स्टेज लाइफ' लक्षात घेतले तर ते प्रहसन बरेच आधी सुरु झाले आहे हे लक्षात येते. ललित कला केंद्र काही व्यायसायिक रंगमंच नाही. कलेचे शिक्षण घेण्याचा, देण्याचा आणि त्यांनी एकत्रितपणे काय दिले-घेतले आहे याचे सादरीकरण श्रोते आणि समाज यांच्यासमोर करण्याचा तो मंच आहे. ललित कला केंद्रातील नाट्यकला शिकणारे, 'जब वुई मेट' मधील 'रामलीला' प्रहसन सादर करणारे विद्यार्थी खरेच नाट्यभोळे आहेत असे मानले तरीही श्रोत्यांसमोर काय आणि कसे सादर करावे किंवा नाही हे त्यांना कळले नाही वगैरे हा मुद्दाच नाही. सादरीकरणाचा परिणाम हा प्रश्न नंतर उद्भवला. रस आणि औचित्य भंगण्याचा कयास त्यांना लावता आला नाही हे पण एकवेळ मान्य करू पण आया-बहिणी वरील अर्वाच्य शिव्या प्रहसनात घालून लोक भावनेप्रती त्यांनी साकारलेली असहिष्णुता आणि चिथावणीखोर भाषा याचे स्पष्टीकरण केवळ हेच कसे असू शकते की हा प्रयोगशीलतेचा नमुना होता? अशा 'प्रयोगशिलतेची' नशा थेट विशिष्ट विचारधारामूलक अभ्यासक्रमातून आणि संस्कृतीभंजक नाट्य प्रशिक्षणातून या भोळ्या विद्यार्थ्यांना करून दिली जाते याचे वाईट वाटते.माझ्या माहितीप्रमाणे, अमेरिकेतील रशियन साम्यवादी राजवटीच्या काळातील नाट्य परंपरेतील कॉन्स्टँटिन स्तानिस्लावस्कीने प्रस्थापित केलेली आणि अमेरिकेतील ब्रॉडवे थिएटर संबंधित नाटककारांनी प्रसारित केलेली 'मेथड क्टिंग' पद्धतीची नाट्यसराव आणि सादरीकरणाची शैली ही अभ्यासक्रमातून शिकवली जाते. पुन्हा माझ्या माहितीप्रमाणे नाट्य कलावंतांच्या भावविश्वाचा मनोविकास हाच अशा नाटकांचा आशय असतो आणि त्यासाठी या कलाकरांच्या 'बॅकस्टेज लाइफ'मधील प्रसंग हेच प्रत्यक्ष नाटकात सादर केले जातात. अशा या गुंतागुंतीच्या नाट्य-प्रकारचे प्रशिक्षण विद्यार्थ्यांना देतांना लोकमान्यता पावलेले महापुरुष, श्रद्धास्थान, धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक संदर्भात वंदनीय मानले जाणारे समकालिक अथवा ऐतिहासिक व्यक्तिमत्त्व यांच्याबद्दल प्रहसनात्मक मांडणी करताना 'बॅड टेस्ट' आणि रसभंग होणे या नाट्यानुभावाशी अत्यंत महत्त्वाच्या पैलूचे प्रशिक्षण नेमके कसे राहून गेले? आणि, या अन्य सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय परिस्थितीमध्ये उपजलेल्या कला-परंपरेच्या आधारे भारतीय सांस्कृतिक आणि ललित-कला प्रभावित करण्याच्या प्रयत्नात 'औचित्य' नावाचे काहीतरी असते हेच नेमके शिकवायचे राहून गेले?जगभरातून येणाऱ्या विचारांना आणि परंपरांना भारतीय लोक केवळ ते 'बाहेरून' आले आहेत म्हणून कधीच नाकारत नाही. असे विचार नाकारणे म्हणजे अभारतीय वागणे होईल, परंतु, ते स्वीकारताना आणि कालाविष्कारातून ते मांडतांना निदान संस्कृती आणि समाज यांच्या दृष्टीतून सादरीकरणाचा आशय, विषय, शैली आणि रसनिर्मिती साधक-बाधक आहे की नाही याची जाणीव विद्यार्थ्यांना करून दिली जात नसेल तर काय फक्त अशा परंपरांचे अपरिपक्व आणि औचित्यहीन अनुकरण एवढेच फक्त या विद्यार्थ्यांना शिकवले जाते? व्हायोलीन हे वाद्य असेच 'बाहेरून' आलेले असतांना दाक्षिणात्य किंवा कर्नाटकी शास्त्रीय संगीतात ते इतके चपखलपणे स्वीकारल्या गेले कारण त्या वाद्यावर कर्नाटकी शास्त्रीय संगीताच्या उज्वल परंपरेचे संस्कार केले गेले. असे अनेक उदाहरण देता येतील. केवळ 'परकीय' संदर्भ आहेत म्हणून काही विशिष्ट विचार, आचार भारतीय समाज नाकारत नाही. त्यांच्या विचारासाहित परकीयांना देखील भारतात सामावून घेतले जाते. हे स्वाभाविकपणे घडते. यांत कोणताही अभिनिवेष भारतीय लोक सहसा बाळगत नाहीत. परंतु, भारतीय जनमानसाला कलाविष्काराच्या माध्यमातून विशिष्ट विचारधारेचे सांस्कृतिक धक्के देऊन 'नाट्य कलाकारांच्या अभिनय संपन्नतेचा मनोविकास' टिपणाऱ्या या नाट्यसराव आणि सादरीकारणाच्या नाट्य आविष्काराचे असे टवाळखोर सादरीकरण करण्याऐवजी नाटककार अतुल पेठे यांनी, महानगरपालिकेतील सफाई कर्मचाऱ्याच्या आधारे साकारलेल्या प्रगल्भ आणि औचित्यपूर्ण अशा 'सत्यशोधक' नाट्य कलाकृतीचे अनुकरण करून विधायक नाट्य अविष्कार साकारणे याचे प्रशिक्षण या विद्यार्थ्यांना दिले असते, तर सादरकर्ते, श्रोते आणि समाज यांच्या रसभंगाचा परिणाम निश्चितच टाळता आला असता.शिव्या या भाषेची अभिव्यक्ती आहेतच पण कला, नाट्य सौंदर्य आणि रसास्वाद यांचा अनुभव घेण्यास आतुर असलेल्या श्रोत्यांना एवढे कळते की घरात शौचाच्या जागेला संडास म्हणतात आणि तो शहरात आपल्या घरातच असतो म्हणून कोणी बाहेरून घरी जाताना संडासमध्ये जातो असे म्हणत नाही. घर म्हणजे घर आणि भाषा म्हणजे भाषा. संडास घरात असला तरी त्याला घर म्हणायचे नसते आणि शिव्या भाषेत असतील तर फक्त शिव्यांना फक्त भाषेची अभिव्यक्ती म्हणायचे नसते हे लोकांना कळते. गायन मैफिलीत सुद्धा हरकतींची 'जागा' फार जपली जाते ती यासाठीच. शिक्षणाच्या माध्यमातून संपूर्ण समाजाची सेवा करण्याची इच्छा निर्माण करणे तसेच शिक्षणातून प्राप्त ज्ञानाच्या आधारे केवळ स्वकल्याण नव्हे तर जनकल्याण साधणे हे शिक्षण व्यवस्थेचे ध्येय आहे. स्वतंत्र भारताच्या पहिल्या पंतप्रधानांना (प. जवाहरलाल नेहरू यांना) असे सांगावे वाटले कारण विद्यापीठीय शिक्षण व्यवस्था आणि समाज जीवन हे एकमेकांत प्रवाहित राहावे आणि त्यायोगे उच्च शिक्षण समाजाभिमुख व्हावे हे त्यांना जाणवले. समाज शिक्षणाभिमुख तेंव्हाच होईल जेव्हा केवळ समाजविन्मुख असणे म्हणजे म्हणजे 'नवा विचार' मांडणे असा शिक्षणाचा अनुचित विचार उच्च शिक्षणातून पसरविणे बंद होईल. वेगळा विचार मांडणे म्हणजे जाणूनबुजून बीभत्स अंगविक्षेप, अश्लील संवाद आणि अश्लाघ्य शिव्या यांचा वापर नाट्य प्रयोगशीलता म्हणून जोपासणे याला कलेचे, इतिहासाचे, शिक्षणाचे प्रगतीशील असणे असे कसे बरे म्हणता येईल? वैचारिक धाडस करताना आपले धाडस अन्य कोणासाठी मनस्ताप ठरत असेल आणि असे धाडस करून नवे जग साकारायचे असेल तर आपण नवतेच्या या औचित्यहीन अविष्कारांनी समाज जोडतो आहोत की तोडतो आहोत? आणि, घडलेल्या एकूणच प्रसंगाला केवळ केंद्रातील विद्यार्थ्यांनी केलेले वैचारिक धाडस असे म्हणणे म्हणजे खरी समस्या दडपवणे असाच प्रकार आहे. या विद्यार्थ्यांना सामाजिक विघटनवादी अशा स्वघातकी आणि अशैक्षणिक अशा सांस्कृतिक राजकारणासाठी केवळ एक प्रक्षोभक माध्यम म्हणून वापरले जाणे म्हणजे राजकीय विचारधारेच्या आधारे साधल्या जाणाऱ्या सांस्कृतिक राजकारणासाठी विद्यापीठीय उच्चशिक्षणाचे केवळ एक माध्यम असा वापर करण्यासारखे आहे. भारत देशाला आत्यंतिक गरजेची असलेली शैक्षणिक गुणवत्ता आणि विकास अशा वैचारिक धाडसातून कसा साधला जाऊ शकतो? याचा निषेध करावा तेवढा थोडाच.चर्चा होईल, पण कशी?'मर्यादा' पाळणे हा पुरषोत्तम होण्याचा एक निकष प्रस्थापित करणाऱ्या श्री राम या देवत्त्वाला पोचलेल्या रामायण महाकाव्यातील महानायकाचे, अयोध्येतील श्रीराम या ऐतिहासिक आणि देवत्त्व बहाल केलेल्या महापुरुषाच्या, पुनर्स्थापित झालेल्या अयोध्येतील मंदिराचा याच भारतीय समाजातील सर्व स्तरातील लोकांनी व्यक्त केलेला आनंद या वास्तवाला सपशेल नाकारून एका विशिष्ट नाट्य प्रयोगाचे प्रशिक्षण विद्यार्थ्यांना देऊन अभ्यासक्रमातील कोण्या एका ज्ञान घटकाचे आणि अशा या प्रयोगाचे सार्वजनिक सादरीकरण म्हणजे एक सांस्कृतिक क्रांती करण्याचा नव-अविष्कार आहे असे त्या कोवळ्या मनाच्या विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबवून नेमके कोणते 'नवे जग' आपण साकारतोय असा प्रश्न सामान्य माणसाला पडणारच, असा माझा कयास आहे. चर्चेच्या माध्यमातून हा प्रश्न निश्चितच सोडवला जाऊ शकतो. फक्त, सादरीकरणात, लोकांनी आपापल्या फोनवर बघितलेल्या, ऐकलेल्या आया-बहिणींच्या नावाने दिलेल्या शिव्या, या प्रकाराला 'विद्यापीठीय शिक्षण व्यवस्थेच्या माध्यमातून व्यक्त झालेल्या नवीन जगाच्या निर्मिती करण्यासाठी केलेल्या सांस्कृतिक क्रांतीच्या, वैचारिक धाडसाच्या अंगाने केलेला निरागस असा रसिकता जोपासणारा नाट्य अविष्कार' असे धडधडीत समर्थन चर्चेच्या प्रयत्नात बाधाच निर्माण करेल. औचित्यपूर्ण कला नाट्य आविष्कार याला केवळ विकल्प देण्यासाठी म्हणून 'औचित्यभंग करणे' हा विकल्प देण्याचा प्रयत्न होत असेल तर 'औचित्य-आग्रह' हा विकल्प समाज स्वीकारेल. राजकीय सत्ता जशी समाजमन संस्कारित करण्याचे एकमेव माध्यम असू शकत नाही तसेच उच्चशिक्षणाधारित स्वघोषित वैचारिक सत्ता सुद्धा समाज मनाचा अनादर करून 'जो जे वांछील तो ते लाहो' हे सूत्र जपणारे आणि जगणारे नवे जग निर्माण करू शकणार नाही. गुरुदेव रवीन्द्रनाथ टागोर यांच्या सुप्रसिद्ध 'चित्त जेथा भयशून्य' या कवितेतील तिसऱ्या कडव्यातील या ओळी इथे खूप समर्पक वाटतात (शुद्धलेखन माझे).जेथा तुच्छ आचारेर मरुबालुराशि बिचारेर स्रोतःपथे फेले नाइ ग्रासि 'जेथे चित्त भयमुक्त असेल, शिर उंच असेल, ज्ञान मुक्त असेल अशा स्वातंत्र्याच्या स्वर्गात माझ्या देशाला जाग येऊ दे', अशा उदात्त अर्थ असलेल्या कवितेत टागोर पुढे म्हणतात, 'जेथे विचारांची सरिता तुच्छ आचरणाच्या वाळवंटात स्वतःचा प्रवाह हरवून बसणार नाही, अशाही स्वातंत्र्याच्या आणि स्वराज्याच्या स्वर्गात, हे विधात्या, माझ्या देशाला जाग येऊ दे'.
लेखक फर्ग्युसन महाविद्यालयाच्या इंग्रजी विभागात सहयोगी प्राध्यापक आहेत.

# रोज सकाळी ‘हा’ चहा पिऊन दिवस सुरु केल्याने शरीराला कशी मदत होते बघा; रेसिपी व फायदे दोन्ही सांगतायत तज्ज्ञ



तुमच्या दिवसाची सुरुवात कशी होते? काही जण सकाळी एक चमचा तूप व कोमट पाणी पित तर काहीजण मेथीचे, धण्याचे, जिऱ्याचे, ओव्याचे, तुळशीचे पाणी पिऊन दिवस सुरु करतात. आता हे काहीजण म्हणजे खरंतर ‘काहीच’ जण आहेत. याउलट फक्त चहा किंवा कॉफी पिऊन पळापळ सुरु करणाऱ्यांची संख्या खूपच मोठी आहे. आज आपण एक असा उपाय पाहणार आहोत जो या दोन्ही गटांना एकत्र आणू शकेल. हो बरोबर वाचलंत, छान वाफाळता चहा घेऊन तुम्ही तुमच्या दिवसाची सुरुवात करू शकता. इंस्टाग्रामवर शेफ शिप्रा खन्ना यांनी या आरोग्यदायी चहाची रेसिपी शेअर केली आहे. सुरुवातीला हा चहा कसा बनवायचा हे आपण पाहूया आणि मग याचे भन्नाट फायदे सुद्धा तज्ज्ञांकडून जाणून घेऊया.चहा कसा बनवायचा? साहित्य पाणी कच्ची हळद गरज असल्यास गूळ गाळून घ्या.खन्ना यांनी सुद्धा आपल्या पोस्टच्या कॅप्शनमध्ये या हळदीच्या चहाचे काही फायदे नमूद केले आहेत. खन्ना सांगतात की, कच्च्या हळदीमध्ये कर्क्युमिन हे दाहक विरोधी आणि अँटिऑक्सिडंट गुणधर्म असलेले सत्व असते. कच्ची हळद जळजळ कमी करण्यास, प्रतिकारशक्ती वाढविण्यास मदत करू शकते. काही अभ्यासांनुसार, यात कर्करोगविरोधी गुणधर्म असू शकतात. तुम्हाला तुमचा चहा गोड आवडत असल्यास तुम्ही गूळ किंवा खोबऱ्याची पावडर घालू शकता.कच्च्या हळदीच्या चहाचे फायदे जिंदाल नेचर क्युअर इन्स्टिट्यूटच्या मुख्य आहारतज्ज्ञ सुषमा पीएस यांनी खन्ना यांच्याशी सहमती दर्शवत इंडियन एक्सस्प्रेसला माहिती दिली की, कच्च्या हळदीमध्ये मुख्यतः कर्क्यूमिन हा प्रमुख घटक असतो. तुमच्या दिनचर्येत विशेषतः सकाळच्या वेळी कच्च्या हळदीचा वापर करून, तुम्ही तुमच्या शरीरात होणारी जळजळ कमी करू शकता. विशेषतः सांधेदुखीचा सामना करणाऱ्या व्यक्तींसाठी हे फायदेशीर ठरू शकते.याव्यतिरिक्त, क्युरक्यूमिनचे अँटिऑक्सिडंट गुणधर्म शरीरातील मुक्त रॅडिकल्सवर प्रभावी असतात ज्यामुळे पेशींचे नुकसान टाळण्यास मदत मिळू शकते. कच्च्या हळदीचे रोगप्रतिकारक शक्ती वाढवणारे गुण तुमच्या शरीराच्या संरक्षण यंत्रणा मजबूत करण्यास मदत करतात. काही अभ्यासात कर्क्युमिनमध्ये कर्करोगविरोधी गुणधर्म असू शकतात असे सुचवले असले तरी, ठोस पुरावे समोर येण्यासाठी अधिक संशोधन आवश्यक आहे. तरीही, कच्च्या हळदीचा तुमच्या दिनक्रमात समावेश करणे हे संपूर्ण आरोग्याला चालना देण्यासाठी एक सक्रिय पाऊल असू शकते.काय लक्षात ठेवावे?हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे की कोणत्याही फायदेशीर गोष्टीसाठी सुद्धा प्रत्येक व्यक्तीच्या शरीराची गरज आणि सहनशीलता भिन्न असते, म्हणून आपल्या आहारात महत्त्वपूर्ण बदल करण्यापूर्वी डॉक्टरांसह सल्लामसलत करणे गरजेचे आहे, विशेषत: तुम्हाला अन्य कोणते आजार असतील किंवा औषधे चालू असतील तर तज्ज्ञांचा सल्ला आवर्जून घ्या.

# स्नायूंच्या मजबुतीसाठी अंड्याचा पांढरा भाग फायदेशीर; पण एका दिवसात व्यक्तीने त्याचे किती सेवन करावे? जाणून घ्या

दररोज अंड्याचं सेवन करणे आरोग्यासाठी चांगले असते, असे आपण लहानपणापासून ऐकत आलोय. दरम्यान, काही वर्षांपूर्वी एका टीव्ही जाहिरातीतूनही ‘संडे हो या मंडे, रोज खाओ अंडे’ असा संदेश देण्यात आला होता. यातून अंडी आरोग्यासाठी किती फायदेशीर असतात ते दिसून येते. जगातील बहुतांश लोक ब्रेकफास्ट, लंच किंवा डिनरमध्ये रोज एक तरी अंडं खातात. यातही अनेकांना अंड्यातील पिवळा भाग तर काहींना पांढरा भाग खायला आवडतो. पण, अंड्यातील पांढऱ्या भागात भरपूर प्रथिने असतात असे सांगितले जाते. विशेषत: फिटनेसबाबत जागरुक असणाऱ्या लोकांनी अंड्याचा पांढरा भाग खाणे अधिक फायदेशीर असते. परंतु, एका व्यक्तीने अंड्यातील पांढरा भाग दिवसातून किती प्रमाणात खाणे सुरक्षित आहे? याविषयी फंक्शनल मेडिसिन एक्सपर्ट डॉ. विजय ठक्कर यांनी द इंडियन एक्स्प्रेसशी बोलताना दिलेल्या माहितीतून जाणून घेऊ.सर्वप्रथम अंड्यातील पांढऱ्या भागात किती प्रमाणात पोषक घटक असतात समजून घेऊ. अंड्यातील पांढऱ्या भागात जवळजवळ शुद्ध प्रथिने असतात. एका अंड्याच्या पांढऱ्या भागात सुमारे ३.६ ग्रॅम प्रथिने आणि फक्त १७ कॅलरीज असतात. कॅलरीच्या सेवनावर लक्षणीय परिणाम न करता प्रथिनांचे सेवन वाढवू पाहणाऱ्यांसाठी हा चांगला पर्याय आहे. शिवाय, अंड्याचा पांढरा भाग फॅटची संख्या कमी आणि कोलेस्ट्रॉलमुक्त असतो, ज्यामुळे हायपरकोलेस्ट्रोलेमिया आणि हाय ट्रायग्लिसराइड्स असणाऱ्या लोकांच्या हृदयासाठीदेखील हे चांगले मानले जाते.एखाद्याने अंड्याच्या पांढऱ्या भागाचे किती सेवन करावे हे



ठरवताना व्यक्तीच्या शारीरिक स्थितीची माहिती घेणे महत्त्वाचे आहे. हे एखाद्याची रोज प्रथिने सेवनाची गरज त्याचे शरीराचे वजन, शरीररचना, क्रियाकलाप पातळी आणि फिटनेस लक्ष्यांसह विविध घटकांवर अवलंबून असतात.बैठी जीवनशैली जगणाऱ्या लोकांच्या आहारात शारीरिक वजनाच्या प्रति किलोग्राम (किलो) मागे ०.८ ग्रॅम (ग्रॅम) प्रथिने असे आवश्यक आहे.

# नरेंद्रजी मोदी यांना तिसऱ्यांदा पंतप्रधान करण्याचा संपूर्ण देशभरातील जनतेनी निर्णय केला–आ. कराड

लातूर : – प्रभू श्रीराम मंदिर उभारणीसह अनेक ऐतिहासिक निर्णय घेणारे, देशाच्या सर्वांगीण विकासाबरोबरच गोरगरीब सर्वसामान्यांना केंद्रबिंदू मानून जनकल्याणकारी योजना राबवणारे जगातील लोकप्रिय नेते नरेंद्रजी मोदी यांना तिसऱ्यांदा पंतप्रधान करण्याचा निर्णय संपूर्ण देशभरातील जनतेने घेतला असून मोदीजींना समर्थन देण्यासाठी आणि लातूरचा भाजपा खासदार मोठ्या मताधिक्याने विजयी होण्यासाठी सर्वांनी आशीर्वाद द्यावेत असे आव्हान भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी केले.

लातूर तालुक्यातील मोजे मसला येथील २ कोटी ४८ लक्ष रुपये खर्चाच्या विविध विकास कामाचा शुभारंभ भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या शुभहस्ते मोठ्या उत्साहाच्या आणि जल्लोषाच्या वातावरणात करण्यात आला. यावेळी ग्रामस्थांनी आ. कराड यांचे वाजत गाजत फटाक्याची आतिषबाजी करत जोरदार स्वागत केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच नरेंद्र आल्टे हे होते. या कार्यक्रमास भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, ओबीसी मोर्चाचे प्रदेश सचिव भागवत सोट, भाजपा लातूर तालुका अध्यक्ष बन्सी भिसे, रेणापूर तालुका अध्यक्ष दशरथ सरवदे, संगायो समितीचे अध्यक्ष वसंत करमुडे, भाजपाचे हनुमंतबापू नागटिळक, साहेबराव मुळे, उमेश बेद्रे, प्रताप पाटील, संभाजी वायाळ, रशीद पठाण, धनराज शिंदे, शाम वाघमारे, भैरवनाथ पिसाळ, भाऊसाहेब गुळबिले, बाबा भिसे, लताताई भोसले, चेअरमन चंद्रकांत वांगस्कर, दीपक वांगस्कर, अशोक सावंत यांच्यासह भाजपाचे पदाधिकारी लोकप्रतिनिधी यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बोलताना आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, गेली ४० वर्षे ज्या कुटुंबाने सत्ता भोगली मोठ्या पदावर काम केले त्यांनी लातूर ग्रामीण मतदारसंघात किती आणि कोणता विकास केला असा प्रश्न उपस्थित करून काँग्रेसवाल्यांनी स्वतःचा कुटुंबाचा आणि आपल्या प्रकल्पाचाच विकास केला. या मतदार संघातील काँग्रेस आमदारांनी गेल्या पंधरा वर्षात जेवढी विकासाची कामे मंजूर केली त्याहून अधिक केवळ तीन वर्षात गावा गावात वाडी तांड्यात विकास कामांना निधी मंजूर करण्यात मला यश आले असल्याचे बोलून दाखविले.

गेल्या वर्षी गाळप केलेल्या उसाच्या भावात पाचशे रुपयांचा फरक आणि वजन काट्यात फरक असून याबाबतीत कोणीतरी बोलले पाहिजे आपण फुकटचं मागत नाहीत कामाचा मोबदला मागतोय त्यामुळे येणाऱ्या काळात आपल्याला हक्कासाठी संघर्ष करावा लागेल. उसाच्या टिपऱ्याचे राजकारण जास्त दिवस चालू देणार नाही. असे सांगून आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की शेतकऱ्याची आणि कार्यकर्त्यांची होणारी आडवणूक टाळण्यासाठी मी ही कारखाना करीत असून येणाऱ्या दसऱ्याला मोळी टाकून शुभारंभ करण्यात येणार असल्याची माहिती देऊन महादेव मंदिर परिसरात बांधण्यात आलेल्या सभागृहाचे कौतुक करून मसला गावच्या सर्वांगीण विकासासाठी निधीची कमतरता भासू देणार नाही अशी ग्वाही दिली.

केंद्र शासन आणि राज्यातील महायुती शासनाच्या विविध विभागाअंतर्गत तसेच आ. कराड यांच्या आमदार निधीतून मसला गावातील विविध सिमेंट रस्त्याचा शुभारंभ, पाणीपुरवठ्यासाठी जलजीवन मिशन अंतर्गत विहीर आणि टाकी बांधकाम, महादेव मंदिर – हनुमान मंदिर – विठ्ठल रुक्मिणी मंदिर परिसरात स्वतंत्रपणे सभामंडप बांधकाम, किचन शेड आरो प्लॅन, नवीन वस्तीत विद्युतीकरण, शेतरस्ता, पांदणरस्ता, जि प शाळेत शौचालय बांधकाम आणि पाणीपुरवठा यासह विविध २ कोटी ४८ लक्ष रुपये खर्चाच्या विकास कामांचा शुभारंभ भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी गरजू २२ लाभार्थ्यांना मंजूर झालेल्या मोदी आवास योजनेअंतर्गत घरकुल मंजुरीचे आणि १७ पात्र लाभार्थ्यांना सांगायो योजनेच्या मंजुरी पत्राचे वाटप करण्यात आले




प्रारंभी कार्यक्रमाचे संयोजक अशोक सावंत यांनी आ. रमेशआप्पा कराड यांच्या माध्यमातून मसला गावात झालेल्या विविध विकास कामाची सविस्तर माहिती दिली. मसला गावातील अत्यंत जुन्या असलेल्या महादेव मंदिराचे बांधकाम करून देण्याबाबत अनेक वेळा अनेक पुढाऱ्यांनी आश्वासने दिली होती मात्र भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी या मंदिराच्या जिर्णोदरासाठी निधी उपलब्ध करून अत्यंत देखणे सभामंडप निर्माण केल्याने ग्रामस्थांत आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. या उत्साहातून आ. रमेशआप्पा कराड यांचा ग्रामपंचायत आणि गावकऱ्यांच्या वतीने चांदीची गदा देऊन यथोचित सत्कार केला. याप्रसंगी ईश्वर बुलबुले, गोपाळ पाटील, समाधान कदम, योगीराज साखरे, विनायक मगर, शंकर चव्हाण, संभाजी लोखंडे, हनुमंत राजमाने, नागनाथ धुमाळ, धनंजय जाधव, प्रशांत चव्हाण, ज्ञानेश्वर जुगल रामेश्वर धुमाळ, सुभाष धुमाळ यांच्यासह मसला गावातील मधुकर वांगस्कर, मल्लिकार्जुन बिडवे, सातलिंग धुमाळ, जनक कदम, मन्मथ धुमाळ, गुणवंत बिडवे, सिद्धेश्वर वांगस्कर, निखिल धुमाळ, अनिल वांगस्कर, गौरीशंकर धुमाळ, माणिक धुमाळ यांच्यासह मसला आणि परिसरातील महिला पुरुष आबालवृद्ध मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## करीना कपूरसारखे फीट दिसायचेय? मग रोज करा ‘हे’ योगासन, वाढते वजन राहिल नियंत्रणात!

योग आज कोट्यवधी लोकांचा फिटनेस फंडा ठरला आहे. योग जगभरात लोकप्रिय झाला आहे. बॉलीवूडचे सेलिब्रिटी, तसेच हॉलीवूडचेही स्टार्सही आता योगाला महत्त्व देऊ लागले आहेत. बॉलीवूडच्या अभिनेत्री कठीण योगासनेही करीत आहेत. या अभिनेत्रींनी त्यांच्या फिटनेसचे गुपित सोशल मीडियावर शेअर केल्यामुळे सध्या त्यातील चक्रासन या योगासन प्रकाराची जास्त चर्चा होते. चला, तर चक्रासन हे योगासन सविस्तर जाणून घेऊ.योग तज्ज्ञ कामिनी बोबडे यांनी ‘द इंडियन एक्स्प्रेस’शी बोलताना चक्रासनाचे फायदे, काय आणि काय करू नये याबद्दल मार्गदर्शन केले आहे.हिवाळ्यात रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यासाठी ‘या’ ७ सुपरफूड्सचा आहारात समावेश करा, शरीराला ठेवा तंदुरुस्त!चक्रासन हे एक उत्कृष्ट योगासन आहे; ज्याला इंग्रजीमध्ये व्हील योग पोझ, असेही म्हणतात. त्याला योगामध्ये उर्ध्वा धनुरासन, असेही नाव देण्यात आले आहे. चला तर, त्याचे आपल्याला काय फायदे आहेत हे जाणून घेऊ. चक्रासनाचे फायदे ऊर्जा आणि शरीरातील उष्णता वाढते.हात, पाय, पाठीचा कणा, पोटाचे स्नायू मजबूत होतात.पेक्टोरल स्नायू उघडतात.खांदे, तसेच हिप फ्लेक्सर व कोर स्नायू ताणले जातात.ग्लुट्स आणि मांड्या मजबूत होतात.बेली फॅट म्हणजेच पोटावरची चरबी कमी करण्यासाठीही चक्रासन करणे फायदेशीर ठरते.मासिक पाळीदरम्यान; ज्यांना पोटदुखी, रक्तस्त्राव यांचा खूप त्रास होतो, त्यांच्यासाठीही हे आसन फायदेशीर आहे.चक्रासन कसे करावे?चक्रासन हे सर्वांत कठीण योगासनांपैकी एक आहे; जे बहुतेक लोक करण्यात अपयशी ठरतात. त्यासाठी तुम्हाला आधी तयारी करावी लागेल.चक्रासन करण्यासाठी सर्वांत आधी जमिनीवर सतरंजी, योगा मॅट टाका आणि पाठीवर झोपा.त्यानंतर डोक्याच्या बाजूला दोन्ही हातांचे तळवे टेकवा.पाय गुडघ्यात दुमडा आणि तळपाय नितंबाच्या जवळ घ्या.आता तळहात आणि तळपायावर भर देऊन पाठ, कंबर, मान, डोके उचला. सुरुवातीला एकदम हे आसन जमणार नाही.त्यामुळे जेवढे जमेल तेवढेच करा. आसनातील स्थिती ३० ते ४० सेकंद टिकविण्याचा प्रयत्न करा. चक्रासन करण्याचा प्रयत्न करण्यापूर्वी तुम्ही तुमचे हात, पाठीचा कणा, स्नायू व पाय मजबूत करण्यासाठी काही आसने केली पाहिजेत. सेतुस्ना, कंधारस्ना, भुजंगासन यांसारख्या आसनांचा तुम्ही सराव केला पाहिजे.

# मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम अंमलबजावणीचा ‘लातूर पॅटर्न’ राज्यभर राबविणार–उद्योग मंत्री उदय सामंत

## मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमाचे उद्दिष्ट पूर्ण करणारा लातूर पहिला जिल्हा

लातूर, दि. १३ (जिमाका): जिल्ह्यात मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमांतर्गत ७६० प्रकरणांचे उद्दिष्ट देण्यात आले होते. राज्यात सर्वप्रथम हे उद्दिष्ट पूर्ण केले असून जिल्ह्यात आतापर्यंत ७६२ नवउद्योजकांना कर्ज उपलब्ध करून त्यांना उद्योग उभारणीसाठी सहाय केले आहे. लातूर जिल्हा प्रशासनाने यासाठी राबविलेल्या कार्यपद्धतीचा ‘लातूर पॅटर्न’ आता राज्यातही राबविण्यात येणार असल्याचे उद्योग मंत्री उदय सामंत यांनी आज येथे सांगितले. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ आणि उद्योग विभागाची मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेचा आढावा घेण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या बैठक सभागृहात झालेल्या आढावा बैठकीत उद्योग मंत्री ना. सामंत बोलत होते. आमदार संभाजी पाटील निलंगेकर, जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर–घुगे, पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, महानगरपालिका आयुक्त बाबासाहेब मनोहरे, उपजिल्हाधिकारी संगीता टकले, नितीन वाघमारे, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे प्रादेशिक अधिकारी अमित भामरे, जिल्हा उद्योग केंद्राचे महासंचालक प्रवीण खडके, उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे–विरोळे, जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक, विविध बँकांचे अधिकारी यावेळी उपस्थित होते. मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमामध्ये जिल्हा प्रशासन आणि बँकांनी समन्वयाने काम करीत नवउद्योजकांना मदत केली ही अतिशय समाधानाची बाब आहे. यामुळे अनेकांच्या कुटुंबाला आर्थिक उत्पन्नाचे साधन मिळणार असल्याचे ना. सामंत म्हणाले. तसेच लातूर जिल्ह्यात या योजनेसाठी राबविलेली कार्यपद्धती राज्यभर राबविण्यात येणार असून लवकरच सर्व जिल्हाधिकाऱ्यांची व्हिडीओ कॉन्फरन्स आयोजित करून योजनेच्या लातूरमधील अंमलबजावणीबाबत माहिती दिली जाईल, असे त्यांनी सांगितले. लातूर जिल्ह्यातील अतिरिक्त औसा, उदगीर आणि जळकोट येथील एमआयडीसीला उच्चाधिकार समितीची मंजुरी मिळाली आहे. लातूर अतिरिक्त एमआयडीसी, तसेच विमानतळासाठी ९.८८ हेक्टर जमिनीच्या भूसंपादनाचा विषय मार्गी लावण्यासाठी लवकरात लवकर शेतकऱ्यांसोबत बैठक घेवून निर्णय घ्यावा. तसेच जिल्ह्यातील एमआयडीसीमध्ये पायाभूत सुविधा निर्मितीचा सूक्ष्म कृती आराखडा सादर करावा. विमानतळासाठी एमआयडीसीच्या ताब्यात असलेल्या ३८ हेक्टर जमिनीवर विकासकामे तातडीने सुरु करावीत. या जागेच्या संरक्षक भिंतीसाठी ८ कोटी रुपये निधी उपलब्ध करून दिला जाईल. या कामाची निविदा प्रक्रिया तातडीने सुरु करावी, असे ना. सामंत म्हणाले. प्रधानमंत्री विश्वकर्मा योजना ही ग्रामीण भागातील कारागीरांसाठी अतिशय उपयुक्त असून जिल्ह्यात या योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी सरपंच, ग्रामसेवक यांचे प्रशिक्षण आयोजित करावे. मोहीम स्वरुपात काम करून या योजनेतून जास्तीत जास्त लोकांना सहाय्य उपलब्ध करून देण्याच्या सूचनाही ना. सामंत यांनी यावेळी केल्या. जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर–घुगे, मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर यांचा सन्मान मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमाचे उद्दिष्ट पूर्ण करणारा लातूर हा राज्यातील पहिलाच जिल्हा ठरला आहे. यासाठी विशेष प्रयत्न केल्याबद्दल जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर–घुगे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर यांच्यासह स्टेट बँक ऑफ इंडिया, महाराष्ट्र ग्रामीण बँक, बँक ऑफ महाराष्ट्र, इंडियन बँकेचे अधिकारी आणि जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापकांचा उद्योग मंत्री उदय सामंत यांच्या हस्ते सन्मानचिन्ह देवून गौरव करण्यात आला. लातूरच्या नमो महारोजगार मेळाव्यात उद्योजकांच्या सहभागासाठी प्रयत्न करणार मराठवाडास्तरीय नमो महारोजगार मेळावा लातूर येथे २४ फेब्रुवारी २०२४ होणार आहे. या महारोजगार मेळाव्यात जास्तीत जास्त उद्योजकांनी सहभागी होवून युवक–युवतींना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करावेत, अशी विनंती आमदार संभाजी पाटील निलंगेकर यांनी केली. त्यानुसार महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ आणि उद्योग विभागाच्यावतीने जास्तीत जास्त उद्योजकांना या मेळाव्यात सहभागी होण्यासाठी सांगण्यात येईल, असे ना. सामंत म्हणाले. रेल्वे बोगी निर्मिती कारखान्याला पूरक उद्योग उभारणीसाठी स्वतंत्र बैठक घेणार लातूर येथे रेल्वे बोगी निर्मिती कारखाना उभारण्यात येत असून याठिकाणी वंदे भारत रेल्वेच्या कोचची निर्मिती होणार आहे. या कारखान्यासाठी आवश्यक पूरक लघुउद्योग लातूर येथे सुरु होण्यासाठी लवकरच मंत्रालयात संबंधित विभागांची आणि उद्योजकांची बैठक घेण्यात येईल, असे ना. सामंत यांनी सांगितले. उद्योजकांशी संवाद साधून जाणून घेतल्या समस्या लातूर जिल्ह्यातील उद्योजकांशी उद्योग मंत्री उदय सामंत यांनी शासकीय विश्रामगृह येथे संवाद साधला. यावेळी उद्योजकांनी त्यांना येणाऱ्या अडचणी मांडल्या. या समस्या सोडविण्यासाठी एमआयडीसी मार्फत करण्यात येत असलेल्या कामांची माहिती ना. सामंत यांनी उद्योजकांना दिली. तसेच काही प्रश्नांवर तोडगा काढण्यासाठी लवकरच स्वतंत्र बैठक आयोजित करणार असल्याचे सांगितले.

# चालू केलेली जिनिंग प्रेसिंग शेतकऱ्यांसाठी ठरली असुन अडचण नसुन खोळंबा- सभापती गजानन मुंडे:

किनवट.ता.प्रतिनिधी. (शेख शौकत) शेतकऱ्यांना वाढीव भाव मिळावा याकरिता मोठा गाजावाजा करत दोन दिवसापूर्वीच एमआयडीसी गोकुंदा येथे कापूस खरेदी करिता शासनाने सीसीआय केंद्र चालू केले. आणि त्याचे थाटात माननीय खासदार व आमदारांच्या हस्ते उद्घाटनही झाले, खरे, परंतु लुंबिनी जिनिंग प्रेसिंग मध्ये दि. १२ फेब्रुवारी रोजी तेथे ना ग्रेडर ना कर्मचारी यामुळे जिनिंग प्रेसिंग बंद अवस्थेत आहे. संबंधित ग्रेडर फोन उचलत नाही. दोन दिवसातच असा खेळखंडोबा चालू झाल्यामुळे, जिनिंग वर आपला कापूस घेऊन आलेले शेतकरी ताटकळत बसलेल्या असुन शेतकऱ्यांनी सहाय्यक जिल्हाधिकारी यांचे कडे धाव घेतली आहे. परंतु ही शासनामार्फत चालवलेली शेतकऱ्यांची एक क्रुर थट्टाच म्हणावी लागेल असा रोष दरम्यान कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती गजानन पाटील मुंडे यांनी व्यक्त केला आहे. याबाबत सविस्तर वृत्त असे की, किनवट कृषी उत्पन्न बाजार समिती अंतर्गत लुंबिनी जिनिंग प्रेसिंग चालू केली असुन. येथे दि. ७ फेब्रुवारी रोजी काही शेतकऱ्यांचा सीसीआय हमीभावाप्रमाणे कापूस खरेदीही केला. आणि सीसीआय खरेदी केंद्र कर्मचारी व





अधिकाऱ्यांनी सोमवारपासून सुरळीत कापूस खरेदी चालू होणार अशी तोंडी हमीही दिली होती. त्यानुसार तालुक्यातील १५ ते २० शेतकरी हे टेम्पो ट्रॅक्टरद्वारे आपला कापूस सदर जिनिंगवर घेऊन आले. परंतु सदर जिनिंगवर कापूस खरेदीचे कोणतेही नियोजन नाही. किरायाने टेम्पो, ट्रॅक्टर, वाहनाद्वारे कापूस आणलेले शेतकरी मात्र तेथे कापूस खरेदी बंद असल्यामुळे अडचणीत आले आहेत. पहिलाच हातघाईला आलेल्या शेतकऱ्यांना वाहनांचा किराया भुर्दंड सोसावा लागणार आहे. लिंबिनी जिनिंग प्रेसिंगच्या या ढिसाळ कारभाराची कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती गजानन पाटील मुंडे, उपसभापती राहुल नाईक, बालाजी बामणे, श्रीराम कांदे यांनी चांगलीच दखल घेत अडचणीत आलेल्या शेतकऱ्यांना सोबत घेऊन तात्काळ सहाय्यक जिल्हाधिकारी किनवट येथे धाव घेतली. त्यांच्या वतीने सहाय्यक जिल्हाधिकारी यांना तातडीने कापूस खरेदी सुरू करा अशा आशयाचे लेखी निवेदन देण्यात आले. केवळ शेतकऱ्यांना थोपटण्यासाठी हे सत्ताधाऱ्यांचे काम असून सदर जिनिंग प्रेसिंगवर कुणाचेच नियंत्रण नाही. कर्तव्यावर नेमविलेले ग्रेडरच लापत्ता आहेत. आणि तेथे तांत्रिक काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा अभाव आहे. परिणामी हे जिनिंग प्रेसिंग शेतकऱ्यांसाठी असून अडचण नसून खोळंबा म्हटल्यासारखे होत आहे. तरी हमीभाव दराने कापूस खरेदी केंद्र तात्काळ चालू करण्यात यावे व यापुढे सुरळीत चालू राहावे. जेणेकरून तालुक्यातील सर्व शेतकऱ्यांचा माल खरेदी होईल. अशी लेखी मागणी कृषी उत्पन्न बाजार समिती किनवटचे सभापती गजानन पाटील मुंडे व त्यांच्या सहकारी संचालक मंडळाच्या वतीने सहाय्यक जिल्हाधिकारी किनवट यांचेकडे निवेदनाव्दारे मागणी केली आहे.

## अंदाजपत्रकासाठी सूचना पाठवाव्यात लातूर महानगरपालिकेचे नागरिकांना आवाहन

लातूर/प्रतिनिधी:लातूर शहर महानगरपालिकेच्या वतीने सन २०२३-२४ चे सुधारित व सन २०२४-२५ चे मूळ अंदाजपत्रक तयार केले जात आहे.यासाठी नागरिकांनी सूचना पाठवाव्यात, असे आवाहन मनपाच्या वतीने करण्यात आले आहे.



अंदाजपत्रकामध्ये शहरातील नागरिकांचा सहभाग असावा या हेतूने मनपा गेल्या काही वर्षांपासून हा उपक्रम राबवीत आहे.शहरातील नागरिक, सामाजिक संघटना,ज्येष्ठ नागरिक आदींनी अंदाजपत्रकासाठी सूचना पाठवाव्यात,असे मनपाला अपेक्षित आहे.मनपाच्या उत्पन्नात वाढ,खर्चात बचत,सेवा- सुविधांमध्ये सुधारणा तसेच शहराच्या विकासात्मक दर्जात वाढ करण्यासाठी नागरिक सूचना करू शकतात.शहरातील नागरिक आपल्या सूचना व अभिप्राय मनपाच्या या मेलवर तसेच मनपाच्या मुख्य कार्यालयात लेखा विभागात ठेवलेल्या सूचनापेटीमध्ये टाकू शकतात.सोमवार दि.२० फेब्रुवारी २०२४ रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत नागरिक सूचना पाठवू शकतात.

मनपाचे अंदाजपत्रक सर्वसमावेशक व नागरिकाभिमुख करण्यासाठी नागरिकांनी या उपक्रमात सहभागी होत सूचना पाठवाव्यात,असे आवाहन मनपाच्या वतीने करण्यात आले आहे.

## लातुरात दुसरा इंटरनॅशनल फिल्म फेस्टिवल

लातूर : प्रतिनिधी महाराष्ट्र शासन, विलासराव देशमुख फाऊंडेशन, पुणे फिल्म फाऊंडेशन व अभिजात फिल्म सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने जगभरातील सर्वोत्कृष्ट चित्रपट रसिकांपर्यंत पोहोचवणारा दुसरा लातूर आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव दि. १५ ते १८ फेब्रुवारीदरम्यान होणार आहे. राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या पुढाकाराने लातूरात होत असलेला या फिल्म फेस्टीव्हलमध्ये लातूर व परीसरातील चोखंदळ चित्रपट रसिकांना देश-विदेशातील पंचवीस दर्जेदार सिनेमे पाहता येणार आहे.हा इंटरनॅशनल फिल्म फेस्टिवल पीव्हीआर थिएटरमध्ये होणार असून मराठवाड्यात अजिठा-वेरुळ महोत्सवानंतर आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव घेण्याचा मान लातूरला मिळतो आहे. हा फिल्म फेस्टिवल १८ वर्षांवरील सर्वांसाठी खुला असून नि:शुल्क आहे. गुरुवार, दि. १५ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ५ वाजता फेस्टिवलचे उद्घाटन राज्याचे सांस्कृतिक मंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते होईल. लातूरचे पालकमंत्री गिरीश महाजन अध्यक्षस्थानी असतील तर प्रमुख पाहुणे म्हणून क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे व पुणे इंटरनॅशनल फिल्म फेस्टिवलचे अध्यक्ष व ख्यातनाम दिग्दर्शक जब्बार पटेल हे उपस्थित राहतील तसेच खासदार ओमप्रकाश राजे निंबाळकर, लातूरचे खासदार सुधाकर शृंगारे, आमदार विक्रम काळे, आमदार सतीश चव्हाण, आमदार सुरेश धस, आमदार रमेश कराड, आमदार संभाजी पाटील निलंगेकर, आमदार आबासाहेब पाटील, आमदार धीरज विलासराव देशमुख,आमदार अभिमन्यू पवार हे लोकप्रतिनिधी पाहुणे म्हणून उपस्थित राहतील.

## डॉ. राहुल वरवंटीकर यांच्या व्याख्यानाचे आयोजन

मुरुड /महेंद्र आल्टे : येथील संभाजी महाविद्यालयात छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त इतिहास व इंग्रजी विभागाच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २० फेब्रुवारी २०२४ रोजी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवन कार्यावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. प्रतिभा निकेतन महाविद्यालय नांदेड, येथील इतिहास विभाग प्रमुख व स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या इतिहास अभ्यास मंडळाचे अध्यक्ष मा. डॉ. राहुल वरवंटीकर प्रमुख व्याख्याते म्हणून उपस्थित राहणार आहेत. तर प्रमुख उपस्थितीमध्ये समाज जागृती शिक्षण संस्थेचे सचिव मा. ॲड. व्ही वाय. पाटील तसेच कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अशोक काळम उपस्थित राहणार आहेत. त्याच दिवशी इतिहास विभागातील विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या 'स्वराज्य' या भितीपत्रकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते होणार आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवन व कार्यावर आधारित घेण्यात येणाऱ्या दि.१८ फेब्रुवारी २०२४ रोजीच्या ऑनलाईन बहुपर्यायी परीक्षेमध्ये प्रथम, द्वितीय व तृतीय तसेच उत्तेजनार्थ क्रमांक पटकावणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा जनरल नॉलेजचा ग्रंथ भेट देऊन सत्कार करण्यात येणार आहे. तरी सर्व विद्यार्थ्यांनी या उपक्रमामध्ये सहभागी होऊन शिवजयंती महोत्सव उत्साहाने व आनंदाने साजरा करण्यासाठी उपस्थित रहावे असे आवाहन इतिहास विभाग प्रमुख प्रा.डॉ.डी.एम. रणदिवे, इंग्रजी विभाग प्रमुख प्रा.डॉ.मीना कदम, प्रा.डॉ.आर.जी.भोसले, आयक्युएसीचे समन्वयक प्रा.एम.बी. गायकवाड, प्रा. राहुल पवार आदींनी केले आहे.

## महात्मा बसवेश्वर कनिष्ठ महाविद्यालयात जंतनाशक मोफत गोळ्यांचे वितरण

लातूर दि. १३ महात्मा बसवेश्वर कनिष्ठ महाविद्यालय, लातूर येथे राष्ट्रीय जंतनाशक दिनानिमित्त जंतनाशक गोळ्यांचे मोफत वितरण करण्यात आले यावेळी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई, उपप्राचार्य प्रा. संजय पवार, प्रा. श्रीनंद पाटील आणि कार्यालय प्रमुख नामदेव बेंदरगे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी प्रस्ताविकपर मनोगत व्यक्त करताना प्रा. संजय पवार म्हणाले की, कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांनी आज जंतनाशक गोळ्या घेणे आवश्यक आहे कारण हा एक पोटाचा विकार असून तो लहान वयामध्ये अधिक प्रमाणात होतो. यावेळी प्रा. श्रीनंद पाटील बोलताना म्हणाले की, जंतनाशक औषधे घेणे अत्यंत आवश्यक आहे. जंतनाशक गोळ्यामुळे रक्तशय, पोटदुखी, भूक मंदावणे, कुपोषण, अस्वस्थपणा, शौचात रक्त पडणे, पोटाला सूज येणे आधी विविध विकारावर विजय मिळवता येतो त्यामुळे या गोळ्या घेणे अत्यंत आवश्यक असल्याचेही ते म्हणाले. या कार्यक्रमाचा अध्यकक्षीय समारोप



करताना प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई म्हणाले की, विद्यार्थ्यांनी जंताचा प्रादुर्भाव प्रादुर्भावाच्या प्रतिबंधासाठी जेवणाच्या आधी हात स्वच्छ धुणे, भाज्या व फळे खाण्यापूर्वी व्यवस्थित धुणे, स्वच्छ व उकळलेले पाणी पिणे, पायात चपला व बूट घालणे, नखे नियमित कापणे व स्वच्छ ठेवणे, शौचालयाचा वापर करणे, उघड्यावर शौचालय शौचालयाचा परिसर स्वच्छ ठेवणे आधी प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात आणि आज या गोळ्याचे सेवन करावे. त्या गोळ्याचे सेवन केल्यानंतर सौम्य दुष्परिणाम झाल्यास काळजी करण्याचे काही कारण नाही त्यामुळे चक्कर येणे, मळमळ, डोकेदुखी, पोटदुखी व उलट्या होणे यासारखे सर्वसामान्य दुष्परिणाम दिसू शकतात त्यामुळे आपण घाबरण्याचे काही कारण नाही असे ते म्हणाले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कार्यालय प्रमुख नामदेव बेंदरगे यांनी केले तर आभार प्रा. एस. एम. पाटील यांनी मानले. या कार्यक्रमाला कनिष्ठ महाविद्यालयातील विज्ञान शाखेतील विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी रंगनाथ लांडगे, शुभम बिराजदार, नरेश वाडकर, अनिल कोळळे यांनी परिश्रम घेतले.

## अशा वर्कर व गट प्रवर्तक संघटनेंच्या हजारो महिलांचा पगारवाढ संदर्भात अजाद मैदान येथे संप

लॉकडावुन कोरोना काळात अरोग्य विभागामधे ज्या महिलांनी आपल्या प्राणांची बाजी लावून जनतेची सेवा केली त्या महिलां गेली चार पाच दिवस झाली उघड्यावर बिना आन्न पाण्याविना झोपल्या आहेत या महिलांना न्याय देण्यासाठी मुंबई अजाद मैदानावरील या संपाला महाराष्ट्राचे मुखमंत्री, अरोग्यमंत्री अता तरी गांभीर्याने घेतील का..? महाराष्ट्रात, देशात लोकशाई जिवंत आहे की मेली...!

नवी मुंबई / के. एच. हनवते :-महाराष्ट्र राज्य गटप्रवर्तक व अशा वर्कर महिला संघटना गेल्या दोन महिन्यापासून संपावर आहेत ते गेली पंधरा वर्षापासून ठाणे, मुंबई, नवी मुंबई महानगरपालिका आरोग्य विभागामधे काम करीत आहेत परंतु अशा वर्कर महिला कामगारांना अद्यापर्यंत कसलाच न्याय मिळत नाही, ठाणे येथील संपाला कोणत्याच अधिकाऱ्यांनी यांची दखल घेतली नाही म्हणून शेवटी दोन महिन्या नंतर ठाणे, नवी मुंबई आणि महाराष्ट्रातील हजारो अशा वर्कर व गट प्रवर्तक महिला संघटना यांनी दिनांक : ११ /२/ २०२४ पासुन मुंबई येथील आझाद मैदान येथे संप करण्याचा निर्णय घेतला आणि अशा वर्कर महिला कामगार संघटनेने मुंबई येथील अजाद मैदान येथे गेल्या चार दिवसांपासून संपाला सुरवात केलेली आहे तरी या संदर्भात महाराष्ट्राचे मुखमंत्री, अरोग्यमंत्री या शासकीय दरबारी अता तरी दखल घेणार की नाय ? गेली आनेक वर्षासुन अशा वर्कर गट प्रवर्तक महिला संघटना कामगारांनी गेली कित्येक वर्ष फक्त ५०००/ रुपये पगारावर काम केले आहे, त्यांनी लॉकडावुन कोरोना काळात आपले प्राण धोक्यात घालून जनतेची शेवा केली आहे. परंतू शासनाचे याकडे दुर्लक्ष झाले आहे. अता तरी शासनाने या संदर्भात योग्य तो निर्णय लवकरात लवकर घेवा आणि महाराष्ट्र शासनाने नवीन जि.आर. कडावा. आणि अशा वर्कर गट प्रवर्तक संघटना महिला कामगारांना अता पंधरा - विस हजार रुपये पगार द्यावे हि मागणी घेऊन अशा वर्कर व गट प्रवर्तक महीला संघना कामगारांनी अजाद मैदान मुंबई या




ठिकाणी महिलांनी हजारोंच्या संख्येत संपाला सुरवात केली आहे. जो पर्यंत आम्हाला न्याय मिळत नाही तोपर्यंत आम्ही हा संप मागे घेणार नाही आसे महाराष्ट्र राज्य गट प्रवर्तक व अशा स्वयंसेविका संघटना अध्यक्ष एम. ए. पाटील आणि सरचिटणीस भगवान दैनी यांनी प्रसिद्धी पत्रकात जाहीर केले आहे.

## राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षात काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना संधी मिळेल-विश्वंभर पवार

किनवट.ता.प्रतिनिधी. (शेख शौकत) शाहू, फुले, आंबेडकर यांच्या विचारांचा वारसा पुढे घेऊन समता, बंधुता, लोकशाही बळकट करण्यासाठी अजितदादा पवार यांच्या नेतृत्वाखाली काम करणा-या कार्यकर्त्यांना संधी उपलब्ध करून देण्यात येईल कोणाचीही निराशा होणार नाही अशी ग्वाही राष्ट्रवादी कॉँग्रस पार्टीचे जिल्हाध्यक्ष इंजि. विश्वंभर पवार यांनी राष्ट्रवादी कॉँग्रेसच्या कार्यकर्त्यांना दिली. गोकुंदा येथिल विश्रामगृहावर राष्ट्रवादी कचिस पार्टीची बैठक पार पडली. सदस्य तथा जिल्हा उपाध्यक्ष इंसाखान, पंकज देशमुख, प्रतिक कदम, वैजनाथ करपुडे पाटील, माजी सरपंच आमन भाई विजय राठोड आदींची उपस्थिती होती. बैठकीचे प्रास्ताविक करताना तालुका अध्यक्ष संजय सिडाम यांनी तालुक्यात पक्षबांधणी करण्यासाठी वरिष्ठ नेत्यांनी विशेष लक्ष देऊन जिल्हा पासुन दिडशे किलो मीटर अंतरावर



असलेल्या या कार्यकत्यांना बळ देऊन विविध विकासकामांचे प्रश्न सोडविण्यासाठी वेळोवेळी मार्गदर्शन व मदत करण्याची अपेक्षा व्यक्त केली. यावेळी पुढे बोलताना जिल्हाध्यक्ष पवार यांनी ठणकावून सांगितले की आपले नेते अजितदादा हे आश्वासन देणारे नेते नसुन कोणतेही काम असो किंवा प्रश्न ते सोडविण्यासाठी तात्काळ निर्णय घेणारे नेते आहेत. युवा कार्यकत्यांना मोठ्या प्रमाणात संधी उपलब्ध करून देण्यासाठी ते नेहमी तत्पर असतात पक्ष बांधणी करण्यासाठो कार्यकत्यांनी प्रयत्न करावेत मी आपले प्रश्न सोडविण्यासाठी वरिष्ठ पातळीवर प्रयत्न करणार असल्याचे सांगितले. या वेळी हमीष चौहान, ओबीसी जिल्हा उपाध्यक्ष म्हणून माहुरचे चिंतामणराठोड, विधानसभा कार्याध्यक्ष ॲड. जि.एस, रायबोळे, उपाध्यक्ष तोंडरे यांच्या नियुकीचे पत्र पवार यांच्या हस्ते देण्यात आले. आभार नवीन जाधव यांनी मानले तर बैठकोला मुगत नगराळे, हरिदास डहाके, दर्शन राठोड, जानिसार चौहान, सलीम खान, रितेश कनाके, विनायक कराळेसह अनेक कार्यकत्यांची उपस्थिती होती.

## पेन्शन योजनांच्या रकमेत वाढ करावी; आमदार शेखर निकम यांचे मुख्यमंत्र्यांना पत्र

चिपळुण: ( विलास गुरव) अपंग, विधवा, श्रावण बाळ, राष्ट्रीय कुटुंब योजना आदी योजनांतील लाभार्थ्यांच्या पेन्शनमध्ये वाढ करून अटींमध्ये बदल करण्यात यावेत, असे पत्र आमदार शेखर निकम यांनी मुख्यमंत्री व सामाजिक न्याय मंत्री एकनाथ शिंदे यांना दिले आहे. आ. निकम यांनी दिलेल्या पत्रानुसार, राज्यातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील नागरिकांसाठी शासनातर्फे विविध योजना राबविल्या जात आहेत. या माध्यमातून लाभार्थ्यांना दिली जाणारी पेन्शन ही सध्या वाढणाऱ्या महागाईच्या काळात अत्यल्प आहे. या अल्प पेन्शनद्वारे स्वतः चा उदरनिर्वाह करणे कठीण होत आहे. त्यातून अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे पेन्शनमध्ये वाढ व अटींमध्ये बदल



करण्यात यावेत. त्यानुसार वय पूर्ण असणारे लाभार्थी व ज्यांना अपत्य नाहीत अशांना पेन्शन मंजूर करण्यात यावी. संजय गांधी निराधार अनुदान योजनेत बसणाऱ्या सर्व लाभार्थ्यांना चार हजार रूपये पेन्शन द्यावी. श्रावण बाळ योजनेतील लाभार्थ्यांना पाच हजार रूपये मंजूर व्हावेत, राज्यातील अपंगांना सरसकट विनाअट घरकूल मंजूर करावे, राष्ट्रीय कुटुंब अर्थसहाय्य योजनेत बसणाऱ्या विधवांना ५० हजार रूपये मंजूर करण्यात यावेत व दारिद्यरेषेची अट रद्द करावी; संजय गांधी, श्रावण बाळ, राष्ट्रीय कुटुंब अर्थसहाय्य योजनेचा लाभ घेण्यासाठी वार्षिक उत्पन्नाची अट बदलून ७५ हजार रूपये करण्यात यावी, असे आ. निकम यांनी पत्रात नमूद केले आहे.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE